एडीचा छोटा पतंग

मराठी : अश्विनी बर्वे





एडी नावाचा एक छोटा मुलगा होता. तो एक खाड़ीच्या वर असणाऱ्या पहाडावर वसलेल्या शहरात राहत असे. त्याचं घर एका फुलं विकणाऱ्या दुकानाच्या वर होते. रोज एडी त्याच्या आईवडिलांना कामात मदत करत असे. आई आणि वडील त्याच्यावर खूप प्रेम करत असत. पण त्यांना त्याची चिंता सुद्धा वाटे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपे पर्यंत एडीला पतंगाशिवाय काहीच सुचत नसे.



आपल्या गल्लीतल्या अधिकतर लोकांसारखा एडीचा परिवार सुद्धा गरीब होता. खरंतर एडी रेशमच्या पतंगाचे स्वप्नं बघत होता पण त्याच्या घरात कागदाचा पतंग खरेदी करण्या इतके सुद्धा पैसे नव्हते.म्हणून तो स्वप्नावर काम चालवून घेत असे. काही दिवसानंतर फुलांचे दुकान बंद झाले. मग एडी शहरातल्या सगळ्यात उंच पहाडावर चढत असे. तिथं तो एका हातात काल्पनिक दोरी पकडून गवतातून पळत असे.



दुसऱ्या हातांनी तो एक अदृश्य दोरी ओढत असे, जसे की तो एक पतंग थंड, निळ्या आकाशात उडवण्याचा प्रयत्न करत आहे. आधी तर दुसरी मुलं एडीला बघून हसले. मग त्यांनी त्याच्याकडे बघणं सोडून दिलं. मग एक दिवस ते सगळेजण एडीच्या मागे-मागे पळाले आणि त्यांनी एका पतंगाकडे इशारा केला जसे की ते खरंच तो बघत आहे.



एडीला पतंगाचे प्रदर्शन लागायचे तो काळ फार आवडायचा. त्याला आठवतं तेव्हापासून त्याने त्या स्पर्धा बघितल्या होत्या. त्याला हे ही आठवत होतं की म्हातारा चान त्या स्पर्धेत एक पुरस्कार देत असे. चान सगळ्या शेजाऱ्यामध्ये श्रीमंत माणूस होता. त्याचं एक मोठं रेस्टॉरंट आणि स्टोअर होतं. गल्लीतून जाणारे सगळे लोक थांबून त्याला नमस्कार करत असत.



नक्कीच म्हातारा चान आता आपल्या रेस्टॉरंट मध्ये काम करत नसे, तो केवळ दुकानाच्या बाहेर बसत असे आणि तो आपल्या लहानपणच्या दिवसाबाबत विचार करत असे जेव्हा तो एवढा श्रीमंत नव्हता. तेव्हा तो चीन मधला एक छोटा मुलगा होता ज्याच्या पुढे सारे जीवन होते.

त्याकाळात त्याचं स्वप्नं फक्त एक कवी होण्याचं होतं. पण जेव्हा त्याच्या परिवाराने एक नवीन व्यापार करण्यासाठी समुद्र पार केला, तेव्हा त्याच्याजवळ कवितेसाठी वेळ राहिलाच नाही.. चानचे स्वप्नं एका छोट्या बी सारखे त्याच्या हृदयात लपून राहिले. पण त्याने ते कधी उखडून टाकले नाही.



प्रत्येक उन्हाळ्यात पतंगाच्या प्रदर्शनात पतंगाची निवड चान करत असी. एक वर्षी सगळ्यात वेगाने उडणाऱ्या पतंगाला पुरस्कार मिळाला. पुढच्या वर्षी पतंगाच्या सगळ्यात लांब शेपटीला पुरस्कार मिळाला. यावर्षी म्हातारा चान त्यांच्या समोर कशाची स्पर्धा ठेवणार आहे हे कोणालाच माहित नसे. पण जसजसा दिवस मोठे आणि गरम होवू लागले होते, चान आपल्या दुकानाच्या बाहेर उन्हात बसून विचार करतांना दिसत असे.

“तो पतंगाच्या स्पर्धेविषयी विचार करत असेल” असे प्रत्येकजण म्हणत असे, आणि कदाचित ती गोष्ट खरी सुद्धा होती. पण अधिकतर चान आपल्या डोक्यात छोट्या छोट्या कवितेच्या रचना करत असे. त्या कविता त्याने कधी लिहल्या नाही.





यावर्षी स्पर्धेची जेव्हा म्हाताऱ्या चानने घोषणा केली, तेव्हा त्या रात्री एडी मोठ्या मुश्किलीने रात्री झोपू शकला. जेव्हा त्याने आपले डोळे बंद केले,त्याला फुलांच्या दुकानावर आपल्या छोट्या खोलीत रंगबिरंगी आकृत्या दिसल्या. रात्रभर पतंगाचा नाद त्याच्या कानात गुंजत होता. शेवटी सकाळ झाली, आणि तेव्हा म्हाताऱ्या चानने पतंगाच्या प्रदर्शनात स्पर्धेची घोषणा केली.

“यावर्षी ,तो म्हणाला, "पुरस्कार सगळ्यात तेज पतंगाला मिळणार नाही, तो सगळ्यात मोठ्या पतंगाला किंवा त्याच्या लांब शेपटीला सुद्धा मिळणार नाही. यावर्षी पुरस्कार केवळ त्याच पतंगाला मिळेल जो सगळ्यात छोटा असेल.” मग चान उन्हाचा आनंद घेण्यासाठी खाली बसला. त्याने झोपण्याच्या आधी, छोट्या वस्तूंच्या उडण्याविषयी एक गुप्त कविता केली. पण नेहमीसारखीच त्याने ती लिहिली नाही.



मग लोकांनी आपआपल्या पतंगावर काम करण्यास सुरुवात केली. त्यांनी पातळ दोरी आणि छोटे,वजनाने हलके बांबू खरेदी केले. जे लोक रेशम खरेदी करू शकत नव्हते. त्यांनी चमकणारा कागद खरेदी केला.



पण एडीजवळ कागदासाठी पण पैसे नव्हते. रोज तो आपल्या आईवडिलांना फुलं विकण्यासाठी मदत करत असे. आणि मग दुपारी शहराच्या उंच पहाडावर चढत असे. तिथं त्याच्या मागे-मागे पळणाऱ्या मुलांच्या बरोबर तो आपल्या स्वप्नातला पतंग उडवत असे.



पतंगाच्या प्रदर्शनाच्या दिवशी, सूर्य उगवला आणि त्याच्या बरोबर हवा सुटली. मग म्हाताऱ्या चान बरोबर प्रत्येकजण सगळ्यात उंच पहाडाच्या टोकावर चढला. एक-एक करून, लोकांनी आपला पतंग उडवले. शेवटी आकाश रंगबिरंगी छोट्या पतंगांनी भरून गेले.



प्रत्येक पतंग दुसऱ्या पतंगापेक्षा छोटा होता.रेशम आणि कागदाचे छोट-छोटे दागिने उन्हात नाचत होते. हे एक आश्चर्य होते की अशा प्रकारच्या नाजूक वस्तू हवेत तरंगत होत्या. पण म्हाताऱ्या चानला हे माहित होते की, ते जरूर उडणार.






तेव्हा चानने एडीकडे बघितले. “तो मुलगा,” तो म्हणाला. “तो मुलगा काय करत आहे? वाटतं की तो एखादा अदृश्य पतंग उडवत आहे.” कारण काही अंतरावर एडी पळत होता आणि त्याच्या मागे-मागे काही मुलं पळत होती.

जेव्हा लोकांनी एडीला आपल्या स्वप्नातला पतंग आकाशात अधिक उंच उडवण्याचा प्रयत्न करतांना पाहिलं तेव्हा आधी सगळे हसले. मग त्यांनी जरा थांबून नीट पाहिलं, तेव्हा त्यांच्यापैकी काहींनी हे स्वीकार केलं की खाडीच्या वर आकाशात एक छोटीशी आणि चमकणारी वस्तू उडतांना दिसत आहे.



म्हाताऱ्या चानला अधिक माहित होतं. त्याने त्या मुलीला पुरस्कार दिला, जिने खरंच खूप छोटा पतंग उडवला होता. ही खूप आश्चर्याची गोष्ट होती की, कोणतेही बीज कितीक छोटे असू द्या ते उडण्यासाठी योग्य ती हवा पकडू शकते.



पण जेव्हा सगळे लोक प्रदर्शनात खाण्यापिण्यासाठी पहाडाच्या खाली उतरत होते तेव्हा म्हातारा चानने एडीला बघितले. “माझ्या बरोबर ये,” तो म्हणाला.



ते दोघं बरोबर रस्त्याच्या मधून येत चानच्या दुकानाच्या दरवाज्या पर्यंत आले. मग ते आत गेले, त्यानंतर बऱ्याच वेळाने खूप शोधाशोध केल्यानंतर म्हाताऱ्या चानने एडीला एक पार्सल दिलं..



“तुझा पतंग इतका छोटा होता की खरंच तो दिसला नाही. तू याबाबत काही करण्याचा प्रयत्न करायला हवा.”.

एडीने पार्सल उघडायला सुरुवात केली. पण म्हाताऱ्या चानने त्याला थांबवलं. “आता तू जा, आता मला एक कविता सुचत आहे.”



एडीने घरी जावून पार्सल उघडलं. लाल कागदाच्या मध्ये एक रेशमी कापड आणि काही वजनाने हलक्या काड्या आणि दोऱ्याचा एकं गुंडा होता.



काही दिवसानंतर सगळ्यात उंच पहाडावर सगळी मुलं परत एकदा एडीच्या मागे-मागे धावत होते. पण यावेळी एडीचा पतंग प्रत्येकजण बघू शकत होता आणि वास्तवात तो एक सुंदर पतंग होता.



म्हातारा चान परत उन्हात आपल्या खुर्चीवर बसायला आला.आपल्या डोक्यात त्याने एका छोट्या मुलाबाबत एक कविता रचली होती, ज्याने आपल्या स्वप्नातला एक छोटा पतंग हवेत उडवला होता. तो पतंग एका बी पेक्षाही छोटा होता. पण यावेळी कविता दूर कुठे जाण्याच्या आधी चानने ब्रश घेतला आणि कविता लिहून टाकली.

समाप्त